DAY —— **14** SEAT NUMBER

2024	III	09	1500	J-905	(M)

ECONOMICS (49)

Time : 3 Hrs. **(7 Pages)** **Max. Marks : 80**

सूचना : *(१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.*

(२) आवश्यक त्या ठिकाणी कोष्टके / आकृत्या काढा.

(३) उजव्या बाजूचे अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

(४) सर्व मुख्य प्रश्नांची उत्तरे नवीन पानांवर लिहावीत.

प्र. १. (अ) योग्य पर्याय निवडा : (५) **[२०]**

(i) सूक्ष्म अर्थशास्त्रीय विश्लेषणात वापरली जाणारी पद्धत.

(अ) राशी पद्धत (ब) समग्र पद्धत

(क) विभाजन पद्धत (ड) सर्वसमावेशक पद्धत

पर्याय: (१) अ, क, ड (२) ब, क, ड

(३) फक्त क (४) फक्त अ

(ii) असंघटित नाणेबाजारात पुढील घटक कार्यरत असतात.

(अ) सावकार (ब) व्यापारी बँका

(क) हुंडी (ड) चिटफंड

पर्याय: (१) अ, ब, क (२) ब, क

(३) ब, ड (४) अ, क, ड

(iii) सरकारच्या ऐच्छिक कार्यांमध्ये पुढीलपैकी कार्ये येतात.

(अ) परकीय आक्रमणापासून संरक्षण (ब) शिक्षण व आरोग्य सेवा

(क) सामाजिक सुरक्षा उपाययोजना (ड) कर संकलन

पर्याय: (१) ब, क (२) अ, ब, क

(३) ब, क, ड (४) वरील सर्व

(iv) निर्देशांकाचे महत्त्व खालील विधानातून शोधा.

(अ) भविष्यकाळाचे पूर्वानुमान काढण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

(ब) भाववाढीचे मोजमाप करण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

(क) योग्य धोरणाची आखणी करण्यासाठी निर्देशांक उपयुक्त

(ड) निर्देशांक चुकीच्या वापरासाठी केला जातो

पर्याय: (१) ब, क, ड (२) अ, ब, क

(३) अ, ब, ड (४) अ, क, ड

(v) रक्तपेढी (Blood Bank) हे याचे उदाहरण आहे.

(अ) स्थल उपयोगिता (ब) ज्ञान उपयोगिता

(क) सेवा उपयोगिता (ड) काळ उपयोगिता

पर्याय: (१) अ, ब, क (२) ब, क, ड

(३) अ, ब, ड (४) फक्त ड

(ब) विसंगत शब्द ओळखा : (५)

(i) मागणीचे प्रकार :

प्रत्यक्ष मागणी, अप्रत्यक्ष मागणी, संमिश्र मागणी, बाजार मागणी

(ii) राष्ट्रीय उत्पन्नाची वैशिष्ट्ये :

आर्थिक वर्ष, पैशात व्यक्त केलेले मूल्य, स्थिर संकल्पना, प्रवाही संकल्पना

(iii) अंदाजपत्रकाचे प्रकार :

तुटीचे अंदाजपत्रक, शून्याधारित अंदाजपत्रक, समतोल अंदाजपत्रक, शिलकीचे अंदाजपत्रक

(iv) कायदेशीर मक्तेदारी :

पेटंट, ओपेक (OPEC), स्वामित्व, बोधचिन्ह

(v) वित्तीय मालमत्ता :

रोखे, भूमी, सरकारी रोखे, व्युत्पन्न रोखे

(क) आर्थिक परिभाषिक शब्द लिहा : (५)

(i) किंमत स्थिर असतांना इतर घटकातील अनुकूल बदलाचा परिणाम म्हणून जेव्हा मागणी वाढते.

(ii) मागणीनुसार पैसे काढल्या जाणाऱ्या ठेवी.

(iii) एकाच वस्तू व सेवेसाठी वेगवेगळ्या ग्राहकांना वेगवेगळ्या किंमती आकारणे.

(iv) एका जादा नगसंख्येचे उत्पादन केल्यानंतर एकूण खर्चात होणारी निव्वळ वाढ.

(v) फक्त उत्पन्नातील बदलाचा परिणाम म्हणून मागणीत घडून येणारा बदल.

(ड) सहसंबंध पूर्ण करा : (५)

(i) सर्वसाधारण समतोल : स्थूल अर्थशास्त्र : : ☐ : सूक्ष्म अर्थशास्त्र

(ii) उत्पादन पद्धत : ☐ : : उत्पन्न पद्धत : घटक पद्धती

(iii) रूप उपयोगिता : फर्निचर : : ☐ : डॉक्टर

(iv) संपूर्ण लवचीक मागणी : $Ed = \infty$: : ☐ : $Ed = 0$

(v) ☐ : पुरवठ्यातील बदल : : इतर घटक स्थिर : पुरवठ्याचे विचलन.

प्र. २. **(अ)** खालील उदाहरणांच्या आधारे संकल्पना ओळखून ती स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) :(६) **[१२]**

(i) मनिषाने वही पेनाचा वापर करून निबंध लेखनाची गरज पूर्ण केली.

(ii) रघुचे वडील त्यांचे पैसे देशातील आणि देशाबाहेरील एकत्रित समभाग आणि कर्ज अशा दोन्ही दीर्घमुदतीच्या निधीच्या बाजारपेठेत गुंतवितात.

(iii) कोरोना महामारीच्या काळात मास्क वापरणे सक्तीचा केल्याने मास्क तयार करणाऱ्या कारखान्यातील श्रमिकांची मागणी वाढली.

(iv) महाराष्ट्राने पंजाबकडून गहू खरेदी केला.

(v) जागृतीला राज्यसरकारकडून दरमहा ₹ ५०००/- निवृत्तीवेतन मिळते.

(ब) फरक स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) : (६)

(i) आवर्ती ठेवी आणि मुदत ठेवी

(ii) एकूण उपयोगिता आणि सिमांत उपयोगिता

(iii) संपूर्ण लवचीक मागणी आणि संपूर्ण अलवचीक मागणी

(iv) किंमत निर्देशांक आणि संख्यात्मक निर्देशांक

(v) अंतर्गत कर्ज आणि बाह्य कर्ज

प्र. ३. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही <u>तीन</u>) : [१२]

(i) मागणीचे कोणतेही चार प्रकार स्पष्ट करा.

(ii) भारतातील भांडवल बाजारासमोरील कोणत्याही चार समस्या स्पष्ट करा.

(iii) उपयोगितेचे कोणतेही चार वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

(iv) सार्वजनिक खर्चात वाढ होण्याची कोणतेही चार कारणे स्पष्ट करा.

(v) स्थूल अर्थशास्त्राची कोणतेही चार वैशिष्ट्ये लिहा.

प्र. ४. खालील विधानांशी आपण सहमत आहात की नाही ते सकारण स्पष्ट करा (कोणतेही <u>तीन</u>) : [१२]

(i) मागील ७५ वर्षाच्या कालावधीत भारताचा विदेशी व्यापाराच्या रचनेत व दिशेत पूर्णतः बदल झाले.

(ii) स्थूल अर्थशास्त्र हे सूक्ष्म अर्थशास्त्रापेक्षा वेगळे आहे.

(iii) किंमतकर्ता हे मक्तेदार बाजाराचे एकमेव वैशिष्ट्य आहे.

(iv) करेतर उत्पन्नाचे अनेक स्त्रोत आहेत.

(v) निर्देशांकाचे अनेक प्रकार आहेत.

प्र. ५. खालील तक्ता, आकृती, उतारा अभ्यासून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[८]**

(i) खालील तक्त्याचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : **(४)**

वस्तू	२००६ च्या किमती (₹) (P₀) (मूळ वर्ष)	२०१९ च्या किमती (₹) चालू वर्ष (P₁)
अ	२०	३०
ब	३०	४५
क	४०	६०
ड	५०	७५
इ	६०	९०

प्रश्न :

(१) किंमत निर्देशांक शोधण्याचे सूत्र लिहा. (१)

(२) ΣP_0 व $\Sigma P_१$ च्या किमती काढा. (१)

(३) किंमत निर्देशांक ($P_0$१)काढा. (२)

(ii) खालील आकृतीचे निरीक्षण करून प्रश्नांची उत्तरे लिहा : **(४)**



(१) उजवीकडे स्थानांतरित होणारा मागणी वक्र ...... (१)

(२) डावीकडे स्थानांतरित होणारा मागणी वक्र ...... (१)

(३) वस्तूची किंमत .... (१)

(४) मागणीतील वृद्धी आणि ऱ्हास या संकल्पना .... या संकल्पने - अंतर्गत येतात. (१)

(iii) खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा : **(४)**

सर्वसाधारणपणे बाजार ही अशी विशिष्ट जागा आहे की जेथे ग्राहक व विक्रते आपल्या वस्तूची देवाण-घेवाण करतात. पण अर्थशास्त्रामध्ये बाजार ही संज्ञा व्यापक अर्थाने वापरली जाते. अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून विचार केला तर बाजार हे एक ठिकाण नसून ती एक यंत्रणा आहे की जिच्याद्वारे ग्राहक व विक्रेते प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे आपल्या वस्तूची देवाण-घेवाण करतात.

बाजाराचे वर्गीकरण स्थळ, काळ आणि स्पर्धेनुसार केले जाते. स्पर्धेनुसारच्या बाजारपेठेमध्ये पूर्ण स्पर्धा आणि अपूर्ण स्पर्धा हे दोन प्रकार आहेत. पूर्ण स्पर्धा ही बाजाराची काल्पनिक संकल्पना आहे. परंतु प्रत्यक्ष व्यवहरात अपूर्ण स्पर्धेचे अनेक प्रकार आढळून येतात. जसे मक्तेदारी, द्वयाधिकार, अल्पाधिकार आणि मक्तेदारीयुक्त स्पर्धा.

सद्यस्थितीत मक्तेदारीयुक्त स्पर्धा ही प्रत्यक्ष व्यवहारात मोठ्या प्रमाणात आढळून येते. यामध्ये पूर्णस्पर्धा व मक्तेदारीची काही वैशिष्ट्ये एकत्रितपणे आढळून येतात. उत्पादन खर्च व विक्री खर्च यातील भिन्नता हे मक्तेदारीयुक्त स्पर्धेचे प्रमुख लक्षण आहे. उत्पादकाच्या उत्पादनाला अधिक मागणी निर्माण करण्यासाठी व वस्तूची विक्री वाढवण्यासाठी करावा लागणारा खर्च म्हणजेच विक्री खर्च होय. यामध्ये जाहिरात, फलक, खिडकी प्रदर्शन इत्यादी चा समावेश विक्री खर्चात येतो.

प्रश्न :

(१) अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून बाजाराची व्याख्या लिहा. (१)

(२) बाजाराचे वर्गीकरण कसे केले जाते ते लिहा. (१)

(३) विक्री खर्चाविषयी आपले स्वमत लिहा. (२)

प्र. ६. सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) : **[१६]**

(i) मागणीच्या लवचिकतेची संकल्पना स्पष्ट करून मागणीच्या किंमत लवचिकतेचे प्रकार स्पष्ट करा.

(ii) राष्ट्रीय उत्पन्नाची संकल्पना स्पष्ट करून राष्ट्रीय उत्पन्न मापनात येणाऱ्या व्यावहारिक अडचणी स्पष्ट करा.

(iii) पुरवठ्याचा नियम गृहीतकासहित सविस्तर स्पष्ट करा.

◆◆◆